# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार

दि.२२/१०/२०२२

## प्रेसनोट

### विनापरवानगी फटाके विक्री करणाऱ्यांवर महानगरपालिकेमार्फत गुन्हा दाखल

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात फटाके विक्रीचे दुकान/स्टॉल लावणेकरिता प्रभाग समिती स्तरावरून निश्चित केलेल्या ठिकाणी अर्जदारांना तात्पुरत्या स्वरुपात परवानगी देण्यात आलेल्या आहेत. महानगरपालिकेने परवानगी दिलेल्या जागेवरच फटाके विक्रीचे दुकान/स्टॉल सुरु आहेत का याची तपासणी करणे साठी फटाके विक्रीचे दुकान/स्टॉल लागलेल्या ठिकाणी प्रभाग समिती व अग्निशमन विभागाचे अधिकारी व कर्मचारी भेट देत आहेत.

दिनांक २२/१०/२०२२ रोजी प्रभाग समिती 'बी' कार्यक्षेत्रात प्रभाग समिती व अग्निशमन केंद्र अधिकारी व कर्मचारी यांनी फटाके विक्रीचे दुकान/स्टॉल सुरु असलेल्या ठिकाणी भेट देऊन तपासणी केली असता यशवंत हाइट्स, सेन्ट्रल पार्क, नालासोपारा (पूर्व) या ठिकाणी एकूण ७ विनापरवानगी फटाके विक्रीचे दुकाने/स्टॉल आढळून आले. प्रभाग समिती 'बी' विरार पूर्व चे प्र.सहा.आयुक्त श्री.दयानंद मानकर यांनी महानगरपालिकेतर्फे संबंधित ७ दुकानदारांविरुद्ध तुळींज पोलीस स्टेशन येथे एफआयआर(FIR) दाखल केली असून संबंधित फटाके विक्री दुकाने/स्टॉल बंद करणेची कारवाई महानगरपालिकेमार्फत तातडीने करण्यात आली. महानगरपालिका कार्यक्षेत्रात सर्व प्रभाग समितींमार्फत विनापरवाना फटाके विक्रीचे दुकाने/स्टॉल लावणाऱ्यांवर कारवाई सुरु करण्यात आली असून सर्व नागरिकांना महानगरपालिकेमार्फत आवाहन करण्यात येत आहे कि, आपल्या निदर्शनास आलेल्या विना परवानगी फटाके विक्री करणाऱ्यांची माहिती महानगरपालिकेला कळवावी, जेणे करून अशा विनापरवानगी फटाके विक्री करणाऱ्यांवर कारवाई करता येणे शक्य होईल.

**मुख्य कार्यालय विरार**
**वसई विरार शहर महानगरपालिका**